संं.फौ.ख. ७११०/२०१५
औरंगाबाद जिल्हा वि. भारती
निशाणी क्र. ६५

<u>आरोपी पक्षातर्फे श्री. आर. आर. चौबे यांच्यामार्फत फिर्यादीचा उलटतपास शपथेवर सुरु–</u>

१. १०,९२,५३९.५५/– ही रक्कम दिनांक ०१.०४.२०१५ ते १२.०४.२०१५ च्या स्टेटमेंटमध्ये नमुद केलेली नाही. दिनांक १२.०४.२०१५ रोजीच्या स्टेटमेंट मध्ये ८,९३,५७९.५५/– पैसे ही रक्कम नाही. १,९८,९९०/– ही रक्कम दाखवण्याकरिता स्वतंत्र कागद मी न्यायालयात दाखल केलेला नाही. दिनांक ०२.१२.२०१४ रोजी दाखवण्यात आलेली रक्कम रुपये ७,१६,७०२/–ही रक्कम खाते विवरणपत्रात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रामध्ये नमुद केलेल्या सर्व रक्कमा बनावट नमुद करुन खाते विवरण पत्रामध्ये नमुद केलेले आहे. मी दाखल केलेले खाते विवरणपत्र फिर्याद सोबत दाखल केलेले नाही. फिर्यादीची साक्ष झाली त्यावेळेससुध्दा खाते विवरणपत्र दाखल केलेले नाही. खाते विवरणपत्रामध्ये कॉलम क्र. ३ मध्ये दस्तावेज दिलेले आहे. ते दस्तावेज त्यांच्या सोबतच्या व्यवहाराचा खाते उतारा आहे. त्या खात्याउता–यावर आरोपीची सही नाही. आरोपीने केलेले लेखीमागणी पत्र नाही. आरोपीला माल पोहच केल्याच्या पोहच पावत्या आमच्या कार्यालयात आहेत. ते आजपर्यंत न्यायालयात का दाखल केले नाही ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या पावत्या माझ्याकडे नसल्याने मी दाखल केलेल्या नाही.

२. मी अकाउंट ऑफिसर म्हणुन नोकरीला आहे. मी त्या पदावर कार्यरत असल्याबाबतचे पत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. या न्यायालयाचा समन्स मला आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने सांगितल्यामुळे मी न्यायालयात साक्ष

देण्याकरिता आलो आहे. जिल्हा दुध संघाचा अधिकारी म्हणुन मी शपथपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडे १०,९२,५३९.५५ पैसे ही रक्कम थकीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन जास्तीचे पैसे काढण्याकरिता आरोपीविरूध्द खोटी केस केली व मी त्यांच्यातर्फे खोटी साक्ष देत आहे. सन २०११ पासुन खाते विवरणपत्र जतन केलेले आहे. बॉस ए आर पी संगणक प्रणालीमध्ये ही जतन केलेली आहे. ते प्रत्येक कर्मचा–याला दिलेल्या वेगवेगळया पासवर्डनुसार ओपन होते. कोणत्या आय पी अॅड्रेस मधुन खाते विवरणपत्र काढले ते खाते विवरणपत्रामध्ये दिसते. खाते विवरणपत्र नि.क्र. ७२ मध्ये कोणाच्या आय पी अॅड्रेस वरुन काढले व कोणत्या पासवर्ड मधुन काढले हे नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ७२ संगणक प्रणालीवरुन काढलेले नसुन एक्स एल शीट वरुन काढुन दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Digitally signed by SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Date: 2025.01.08 18:05:37 +0530

**(श्री.एस.एल. रामटेके)**

दिनांक ०८.०१.२०२५

१५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
औरंगाबाद.